# Maharashtra Pharmacist Association

Unite, Organize and Fight for Right!

# "Aamhi Pharmacist!"

Vol. No. I Issue No. 1 Bilingual Monthly Magazine March 2009

## Editorial

MPA extend its greetings to all its readers for publishing the first issue of "Aamhi Pharmacist!". I am very happy to present "Aamhi Pharmacist!" to all fellow pharmacists of Maharashtra, Indeed its a long cherished dream which has been fulfilled today. I am sure messages and articles published in "Aamhi Pharmacist!" will help accomplish our goals. We will strive for gaining the status to each and every pharmacist. Already we have made several demands to State and Central Governments for the overall upliftment of pharmacy profession.

The magnitude of our strength lies in total numbers of pharmacists of Maharashtra. We are about 1 lakh pharmacists as on today in Maharashtra, and about 50,000 students are taking pharmacy education. This strength of number of pharmacists is more than sufficient to take any challenge the pharmacy profession facing today.

Nevertheless taking MPA's mission forward, our association needs large amount of funds. While talking with senior colleagues and also through appeal letters we have expressed the urgent need to raise the fund. We are definitely short of funds and because of this lacuna we are running out of time. Dear friends we are loosing precious time which is definitely going to delay our activities for reaching the goals.

To carry on the activities of association we will focus on membership drive which will connect all of us under the umbrella of MPA and will also help to raise the necessary corpus fund. Once again we make fervent appeal to one and all pharmacists of Maharashtra to become member of MPA and also donate generously the amount which you can.

# नौकरीच्या शोधात फार्मासिस्ट सहकाऱ्यांची दैना!

मित्रांनो, जेव्हा महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन ची स्थापना केली त्यावेळी काही महत्वाचे मुद्दे तातडीने सोडवण्यासाठी आपण हाती घेतले होते. त्यातील एक अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे डिप्लोमा, डिग्री आणि पदव्यूत्तर फार्मासिस्ट सहकाऱ्यांच्या नोकरीचा. आज असंख्य सहकारी नोकरीसाठी वणवण फिरत आहेत. त्यांना फार्मसीचा अभ्यासक्रम का केला असा प्रश्न भेडसावतोय. काही सहकारी तर मनामध्ये आत्महत्येचा विचार करू लागले आहेत. काही पालक आपण आपल्या मुलाला फार्मसी कोर्स का करावयास भाग पाडले अशी खंत व्यक्त करीत आहेत. ही बाब आपण सर्वांनी मनाला लावून घेण्यासारखी आहे. नोकरीची समस्या अत्यंत भयाण स्वरूप धारण करण्यापुर्वी त्यावर आपल्याला मार्ग शोधून काढायला हवा. यासाठी तातडीचे उपाय शोधावे लागतील.

दुर्दैवाने नोकरी मिळत नसलेल्या सहकाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु नेमके किती सहकारी नोकरीविना आहेत हे कळून यायला आपल्याकडे आकडेवारी उपलब्ध नाही. तेव्हा आपण सर्वांना कळकळीची विनंती आहे की अशा गंभीर समस्यावर उपाय शोधतांना आपण सर्वजण महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन चे सभासद होवू या आणि सर्व प्रकारची आकडेवारी तयार करून, नोकरीविना असलेल्या फार्मसिस्ट सहकाऱ्यांना नोकरी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू या. हि गोष्ट जेवढ्या लवकर करता येईल तेवढ्या लवकर ही समस्या सुटण्यास मदत होईल.

दरम्यानच्या काळात आपण सर्वांना व विशेष करून अन्न व औषध प्रशासनातील सहकारी यांना नम्र आवाहन करण्यात येत आहे की आपल्यातला एकही फार्मासिस्ट सहकारी नोकरी विना राहणार नाही यासाठी सर्वांनी वैयक्तिकरित्या प्रयत्न करणे आवश्यक आहे. हे महत्वाचे कर्तव्य समजून प्रत्येक सहकाऱ्याने नोकरीविना असलेल्या फार्मासिस्ट सहकाऱ्यास नोकरी लावून दिली तर हजारो फार्मासिस्ट ना नोकऱ्या नक्की मिळू शकतील!

तसेच नोकरीसाठी उपलब्ध जागांबाबतची माहिती आपणास ठाऊक असल्यास ती संघटनेकडे दिली तर संघटना नोकरी नसलेल्या सहकाऱ्यांचा शोध घेऊन त्यांना ही संधी उपलब्ध करून देण्यास तत्पर राहील. ज्यांना नोकरी हवी आहे व ज्या संस्थांकडे नोकरी उपलब्ध आहे अशासाठी आपले मासिक "**आम्ही फार्मासिस्ट !** " ची पाने आपण उपलब्ध करून देणार आहोत. तसेच सर्व फार्मासिस्ट व संस्था नोकरी संबंधातील माहिती ई-मेल द्वारे आपल्या संघटनेच्या ई-मेल पत्यावर पाठवू शकतील. आपला ई-मेल पत्ता **admin@mahapharma.com** असा आहे याची कृपया नोंद घ्यावी.

तेव्हा पुन्हा एकदा सर्व फार्मासिस्ट बधुंना आवाहन करतो की त्यांनी सर्वप्रथम कर्तव्य समजून कमीत कमी एका फार्मासिस्टला नोकरी मिळवून द्यावी आणि आपले कर्तव्य पूर्ण करावे.

आपण केलेल्या या पवित्र कार्यासाठी **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन** आपली सदैव ऋणी राहील!

# महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन पहिले राज्यव्यापी आधिवेशन थाटात संपन्न

दि. ८ फेब्रुवारी, २००९ रोजी ठाणे येथे **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन** च्या वतीने पहिले राज्यव्यापी अधिवेशन अतिशय थाटात व आनंदाच्या वातावरणात संपन्न झाले.

पूर्ण दिवसभर रंगलेल्या या अधिवेशनामध्ये असोशिएशनचे अध्यक्ष श्री. बी.ई.खोमणे यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणात जमलेल्या सर्व फार्मासिस्ट बंधु व भगिनी तसेच प्रमुख पाहुणे डॉ. बी.सुरेश, अध्यक्ष, फार्मसी कौंसील ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांचे स्वागत केले व फार्मासिस्ट बंधुंच्या ज्वलंत मागण्यांचा उहापोह करून पुढील काळात सर्वांनी मिळून आपले ध्येय कसे गाठता येईल याकडे सर्वांचेच लक्ष वेधले. प्रमुख पाहुणे डॉ बी, सुरेश यांनी फार्मसी व्यवसायाच्या भवितव्याविषयी आपले मनोगत अतिशय निर्भिडपणे मांडले.

यानंतर आपल्या असोशिएशनच्या माध्यमातून राज्यात फार्मसी व्यवसायाचा विकास कशा प्रकारे होईल या विषयावर आयोजिलेला परिसंवाद त्यात भाग घेतलेले नामवंत वक्ते डॉ. किशोर जैन, डॉ. संजय सावंत, डॉ. आत्माराम पवार, श्री. एस. आर. साळुंखे, श्री. सचिन इटकर, डॉ मिलिंद वाघ, डॉ. महेश बुरांडे यांच्या खुमासदार शैलीमुळे अत्यंत रंगला व गाजला. या परिसंवादाचे चेअर पर्सन श्री. व्हि.डी. देशमुख, माजी आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी संघटनेच्या कार्यास आर्शिवाद देतांना काही महत्वपूर्ण बाबी नजरेस आणून दिल्या. यांनतर जमलेल्या पाहुण्यांनी व सर्व सभासदांनी दुपारच्या जेवणाचा आस्वाद घेतला व लगेचच दुपारच्या सत्राचा प्रारंभ झाला.

या सत्रामध्ये आपल्या संघटनेचे मुखपत्र “**आम्ही फार्मासिस्ट !**” च्या पहिल्या विशेष अंकाचे प्रकाशन डॉ. आर. एस. गौड, डीन, फार्मसीशास्त्र, नरसी मोनजी अभिमत विद्यापीठ, मुंबई यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहाच्या वातावरणात करण्यात आले. सदरहू अंकामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, मा. श्री. अशोक चव्हाण, उपमुख्यमंत्री मा. श्री. छगन भुजबळ साहेब, मंत्री महोदय सर्वश्री. हर्षवर्धन पाटील साहेब, राजेश टोपे साहेब व राजेंद्र शिगणे साहेब व डॉ. बी. सुरेश, अध्यक्ष, फार्मसी कौसील ऑाफ इंडिया, नवी दिल्ली यांनी आपल्या संघटनेच्या कार्यास, व फार्मसी व्यवसायातील नामवंत सहकाऱ्यांचा सत्कार सोहळ्यास तसेच आपण सुरू केलेल्या **आम्ही फार्मासिस्ट** ! या मासिकास शुभेच्छा दिल्या आहेत. या अंकामध्ये मान्यवरांचे निवडक व वेधक लेख, आपल्या संघटनेने आतापर्यंत राज्य व केंद्र शासनाकडे केलेल्या विविध मागण्या व ज्या नामवंत सहकाऱ्यांना एम. पी.ए ॲवॉर्ड दिला त्या सर्व सत्कार मुर्तींचा संक्षीप्त परिचय इत्यादि बाबींचा अंतर्भाव केला आहे. या अंकाचे स्वागत सर्वच सभासदांनी मनापासून केले आहे. हा अंक नक्कीच संग्रहणीय ठरला आहे.

या अधिवेशनाचे सर्वात मोठे आकर्षण ठरले ते म्हणजे आपण सर्वांनी मिळून आपल्या परिवारातील अनुभवी व जेष्ठ तसेच आपल्या कार्याने तळपणाऱ्या काही तरूण सहकाऱ्यांचा एम. पी.ए अवॉर्ड, शाल व श्रीफळ, पुष्पगुच्छ तसेच मानपत्र देऊन सत्कार केला. तत्पुर्वी आपल्या संघटनेचे सचिव श्री. व्ही.डी.पाटील यांनी आपल्या स्फुर्तिदायक भाषणामधून व्यवसायापुढील अडचणी सोडविण्यासाठी आपण सर्वांनी मिळून कंबर कसून धडाडीने कामास लागले पाहिजे असे आवाहन केले व एम पी ए अवॉर्ड देण्यामागची संघटनेची भूमिका विषद केली.

आपल्या परिवारातील नामवंत बंधू व भगिनी, श्री. केशवराव विष्णूपंत झाल्टे, कम्युनिटी फार्मासिस्ट, नागपूर, श्री. जयकुमार शेटे, प्राचार्य, राजाराम बापु पाटील फार्मसी कॉलेज, कासेगाव, जि. सांगली, प्रा. डॉ. अशोक पांडुरंग मेहेरे, शरद पवार कॉलेज ऑफ फार्मसी, वानाडोंगरी, नागपूर, डॉ. सुरेश स. जाधव, डायरेक्टर (टेक्निकल), सिरम इंस्टीट्यूट, हडपसर पुणे, प्रो. आर. एस. गौड, डीन, फार्मसीशास्त्र, नरसी मोनजी अभिमत विद्यापीठ, मुंबई, श्री. स. अ. मोमीन, सह आयुक्त (मुख्यालय) व औषध नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र राज्य, अन्न व औषध प्रशासन, मुंबई, श्री. हिंदुराव ज्ञानदेव साळुंखे, सह आयुक्त (कोकण विभाग), अन्न व औषध प्रशासन, ठाणे, डॉ. सतीश यशवंत गाभे, प्राचार्य, सि.यु.शाह कॉलेज ऑफ फार्मसी, एस.एन.डी.टी., मुंबई, डॉ. सतिश ब. भिसे, प्राचार्य, शासकिय फार्मसी महाविद्यालय, कराड, श्री. विजय किशोर विसपुते, चिफ फार्मासिस्ट, वानलेस हॉस्पिटल, मिरज, श्री. बलवंत डी. तोरस्कर, मॅनेजर (टेक्निकल),भारत सिरम, ठाणे, श्री. चंद्रकांत फुलचंद शाह, कम्युनिटी फार्मासिस्ट, ठाणे, श्री. मोहन दत्तात्रय बांदिवडेकर, प्राचार्य, के.सि.डी.ए., इंस्टीट्यूट ऑफ फार्मसी, कोल्हापूर, डॉ. सुरेश आर. सरवडेकर, सहाय्यक संचालक, (औषधी खरेदी सेल) महाराष्ट्र राज्य, मुंबई, डॉ. के.पी. भुसारी, प्राचार्य, शरद पवार कॉलेज ऑफ फार्मसी, वानाडोंगरी, नागपूर, प्रा. डॉ. नरेश जे. गायकवाड, डिपार्टमेंट ऑफ फार्मास्यूटीकल्स सायंसेस, नागपूर, श्री. अविनाश दिवाकर देवधर, मॅनेजर, बायर इंडीया, ठाणे, डॉ. एम. एन. सराफ, प्राचार्य, बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी, मुंबई, श्री. अशोक दशरथ वडगावकर, चिफ फार्मासिस्ट, बी.पी.टी. हॉस्पिटल, वडाळा, मुंबई, डॉ. सी. व्ही. अच्छरा, प्राचार्य, के.एम.कुंदनानी इंस्टीट्यूट ऑफ फार्मसी, उल्हासनगर, डॉ. एम.एस. गाडगे, प्राचार्य, स्टर्लिंग कॉलेज ऑफ फार्मसी, नेरूळ, नवी मुंबई, प्रो. डॉ. के. आर. महाडिक, प्राचार्य, कॉलेज ऑफ फार्मसी, भारती विद्यापीठ, पुणे, डॉ. विजय रघुनाथ पाटील, प्राचार्य, कॉलेज ऑफ फार्मसी, फैजपूर, जि. जळगाव, डॉ. मोहन काळे, प्राचार्य, गोविंदराव वंजारी कॉलेज ऑफ फार्मसी, बुटीबोरी, नागपूर, डॉ. महेश बुरांडे, डायरेक्टर (टेक्निकल), बिलकेअर, लि. पुणे, डॉ. पी.जी. येवले, प्राचार्य, इंस्टिट्यूट ऑफ फार्मस्यूटीकल एज्यूकेशन ॲण्ड रिसर्च, बोरगाव (मेघे), वर्धा, प्रो. धन्यकुमार दादा चौगुले, प्राचार्य, अप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी, सांगली, प्राध्यापक डॉ. प्रदिप वाविया, डिपार्टमेंट ऑफ फार्मस्यूटीकल्स, केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई, डॉ. कैलाश ग्यानचंद बोथरा, प्राचार्य, एस.एस.एम.एस. कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे, श्री. प्रभाकर विष्णू जेजूरकर, कम्युनिटी फार्मासिस्ट, तुर्भे, नवी मुंबई, डॉ. किशोर एस. जैन, प्रचार्य, सिंहगड कॉलेज ऑफ फार्मसी, वडगाव, पुणे, प्राध्यापक श्री. रमेश सुका खर्डे, डि.एफ.लोढा कॉलेज ऑफ फार्मसी, चांदवड, जि. नाशिक, श्री. साहेबराव आर. साळुंखे, सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, औरंगाबाद, डॉ. विलासराव जे. कदम, प्राचार्य, कॉलेज ऑफ फार्मसी, भारती विद्यापीठ, बेलापूर, नवी मुंबई, श्रीमती. झरीन खेटी, चिफ फार्मासिस्ट, सैफी हॉस्पिटल, मुंबई, प्रा. सुभाष वारे, माजी अध्यक्ष, राष्ट्रसेवा दल, पुणे, श्री. पृथ्वीराज पाटील, चेअरमन, गुलाबराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, मिरज, श्री. आर. व्ही. शेटे, प्राचार्य, राजगड ज्ञानपिठ कॉलेज ऑफ फार्मसी, भोर, पुणे, डॉ. भागवत निवृत्तीराव पोळ, प्राचार्य, महाराष्ट्र, कॉलेज ऑफ फार्मसी, निलंगा, जि. लातूर, प्रो. मदन एस. जगताप, चेअरमन, गौरीशंकर एज्यूकेशनल ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, सातारा, प्राध्यापक डॉ.आत्माराम पवार, कॉलेज ऑफ फार्मसी, भारती विद्यापीठ, पुणे, प्राध्यापक डॉ. मिलींद वाघ, एन.डी.एम.व्ही.पी., समाज कॉलेज ऑफ फार्मसी, नाशिक, प्राध्यापक श्री. सनाऊल्ला अ. तांबोळी, एच.ओ.डी., अप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी, सांगली, श्री. सुनिल जी. देशपांडे, जनरल मॅनेजर मार्केटींग, रेप्टॅकोस, ब्रेट ॲण्ड कंपनी लि., मुंबई, श्री. किसन तुकाराम मोरे, वरिष्ठ औषध निरीक्षक (गुप्त वार्ता शाखा), अन्न व औषध प्रशासन, मुंबई, डॉ. संजय दिनकरराव सावंत, प्राचार्य, श्रीमती. काशीबाई नवले कॉलेज ऑफ फार्मसी, कोंढवा (बु.), पुणे, डॉ. पी.डी. चौधरी,

प्राचार्य, मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे, प्राध्यपक श्री. मिलींद. जे. उमेकर, प्राचार्य, भोयर कॉलेज ऑफ फार्मसी, कामटी, नागपूर, श्रीमती. मंजिरी संदीप घरत, उपप्राचार्य, के.एम.कुंदनानी फार्मसी पॉलीटेक्निक, उल्हासनगर, डॉ. संपदा पी. पटवर्धन, डायरेक्टर, ड्रग इन्फरमेशन सेंटर, महाराष्ट्र राज्य फार्मसी कौंसिल, मुंबई, श्री. सचिन इटकर,जनरल मॅनेजर (बिजनेस डेव्हलोपमेंट), बिलकेअर रिसर्च इंस्टीट्यूट, पुणे, श्री. मुन्नवर अली अन्सारी, कम्युनिटी फार्मासिस्ट, भिवंडी, श्री. सतिश अ. तिवारी, कम्युनिटी फार्मासिस्ट, मुंबई, श्री. माधव (मयूर) प्र. पाटील, क्लिनीकल डाटा मॅनेजर, फार्मानेट क्लिनीकल सर्व्हिसेस, मुंबई, यांचा ह्रद्य सत्कार प्रमुख पाहुणे डॉ.बी. सुरेश, डॉ. आर. एस, गौड, श्री. एच.डी.साळुंखे, सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन ठाणे यांच्या हस्ते करण्यात आला.

सत्काराला उत्तर देतांना सत्कार मुर्तींनी आपल्या भावना व्यक्त करतांना संघटनेस शुभेच्छा दिल्या तसेच संघटना दिवसें दिवस आपल्या व्यवसायाच्या उत्कर्षासाठी नक्कीच मेहनत घेईल असा आशावाद व्यक्त केला. श्री. पी.एल.आपसिंगेकर, माजी सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन पुणे यांनी हा कार्यक्रम ज्या व्यक्तींनी व संस्थांनी सहभाग घेऊन मदत केली व यशस्वी केला त्या सर्वांचे आभार मानले.

# कुंदनानी फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा शोधनिबंधास प्रथम क्रमांक

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या राज्यस्तरीय शोधनिबंध स्पर्धेत उल्हासनगरच्य प्रिन्सिपॉल के. एम. कुंदनानी फार्मसी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. गेली तीन वर्षे कुंदनानी फार्मसीचे विद्यार्थी या स्पर्धेत हे यश संपादन करीत आहेत.

भुलढाणा येथील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये ही स्पर्धा नुकतीच पार पाडली. या स्पर्धेत राज्यातील ३८ फार्मसी कॉलेजमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत कुंदनानी फार्मसीचे डिप्लोमा इन फार्मसी अंतिम वर्षाचे अरवंद परिहार, विनोद शर्मा, निखिलेश धुरिय, नितेश अग्रवाल यांनी यश मिळवले. या विद्यार्थ्यांनी कुपोषण व त्यामध्ये औषध विक्रेत्याची भूमिका या विषयावर शोधनिबंध सादर केला. उत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण केल्याबद्दल उत्कृष्ट सादरीकरणाचे पारीतोषिक अरविंद परिहार याला मिळाले.

या विद्यार्थ्यांना प्राचार्य सी.व्ही. अच्छरा यांच्या पुढाकाराने प्रा हेमंतकुमार चव्हाण, उपप्राचार्य मंजिरी घरत यांनी मार्गदर्शन केले. या विद्यार्थ्यांनी वाडा, भिवंडी परिसरातील दुर्गम भागात जाऊन तेथील बालकांचे सर्वेक्षण केले. यामध्ये बालकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण आढळून आले. याविषयी औषध विक्रेते काय भूमिका बजावू शकतात. यासाठी करावयाच्या उपाययोजनेंविषयीचा शोधनिबंध या विद्यार्थ्यांनी तयार केला आहे. (साभार : दै. लोकसत्ता, दिनांक ७ मार्च, २००९)

## महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन च्या वतीने आरोग्य सुधारणा मोहिम कार्यक्रम

सर्व फार्मासिस्ट, डॉक्टर व नर्सेस यांचा आरोग्याची काळजी घेणाऱ्या टीममध्ये समावेश होतो. हे तिघे व्यवसायिक समाजाच्या आरोग्याची धुरा सारख्याच जबाबदारीने व्यक्तिशः व त्यांच्या व्यवसायाच्या माध्यमातून सांभाळतात. जागतिक आरोग्य संघटनेने "आरोग्याची व्याख्या " करतांना असे म्हटले आहे की शारिरीक, मानसिक व सामाजिक स्वास्थ्याची पूर्ण अवस्था म्हणजे आरोग्य, केवळ रोगांचा अभाव म्हणजे आरोग्य नव्हे. आपल्याला माहित आहे की जागतिक आरोग्य संघटनेने तीन दशकापूर्वी दोन हजार सालापर्यंत "सर्वांसाठी आरोग्य " हा संकल्प केला होता. परंतु २००९ सालामध्ये भारतासारख्या गरीब देशामध्ये ही कल्पना कागदावरच आहे. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी आम्हा फार्मासिस्टना आरोग्य सेवेमधील आपली भूमिका पार पाडण्यासाठी सिध्द व्हावे लागेल. आपल्या फार्मसी प्रोफेशनच्या अस्तीत्वासाठी असे करणे अपरिहार्य आहे.

फार्मासिस्ट बंधुंनी ग्रामीण भाग व शहरातल्या गरीब वस्तीतील लोकांसाठी त्यांचे आरोग्य सुधारावे म्हणून एकात्मक कार्यक्रमाचे आयोजन करणे ही फार्मसी व्यवसायाच्या उत्कर्षाची पहिली पायरी मानल्या गेली पाहिजे. याच दृष्टीकोनातून **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन** चा हा प्रकल्प सर्व फार्मसी महाविद्यालयांनी राज्यभरातून राबविण्याची मोहिम हाती घेतली पाहिजे.

या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या प्रेरणेने प्राध्यापक वर्ग, कर्मचारी वर्ग व विद्यार्थ्यांना सहभागी करून ही मोहीम यशस्वीरित्या राबविण्यात येईल यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या सोयीचे परंतु ज्यागावी आरोग्य सुविधा फारशा उपलब्ध नाहीत अशी गावे किंवा शहरातील गरीब वस्तीतला एखाद्या भाग कायम स्वरूपी निवडावा. त्या ठिकाणच्या लोकांची आरोग्यविषयक सर्व माहिती संकलीत करावी. डॉक्टर लोकांना सोबत घेऊन लोकांची वैद्यकीय तपासणी करून घ्यावी. त्यामध्ये किरकोळ आजारावर उपचार करण्यात यावेत. तसेच काही दुर्धर आजाराने ग्रासलेल्या रोग्यांना उपचार मिळण्यासाठी नजीकच्या शहरातील चांगल्या रूग्णालयांची नावे सुचवून अशा रोग्यांना नियमित उपचार करून घेण्यास उद्युक्त करावे. तसेच त्यांना जी काही आर्थिक मदत लागेल ती आपल्याच परिसरातील एखाद्या ट्रस्टच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत.

हे करत असतांना तेथील लोकांची आरोग्य विषयक माहिती जसे नाव, वय, लिंग, पत्ता, वैद्यकीय तपासणीचे निष्कर्ष व त्या अनुषंगाने संकलित इतर माहिती जसे कुपोषण, पर्यावरण, आरोग्याच्या माहितीचा अभाव, प्रतिबंधात्मक उपचार, शासकीय आरोग्यसेवेची उपयुक्तता, इत्यादी बाबींचे अध्ययन करून तशा नोंदी तयार करणे व त्यावर उपाय शोधण्यासाठी संबंधीत यंत्रणेशी संपर्क करून तेथील रहिवाशांना सर्वोतोपरी मदत मिळण्यासाठी जाणीव पूर्वक प्रयत्न करावे लागतील. हे करत असतानांच आपल्या महाविद्यालयांना एनजीओ म्हणून नोंद करता आली तर अशा कार्यासाठी शासकीय किंवा खासगी संस्था मार्फत निधी देखील भविष्यात उपलब्ध होऊ शकेल.

हे उपक्रम राज्यातील सर्व फार्मसी महाविद्यालयांनी त्वरित हाती घ्यावेत म्हणून संघटना आपणा सर्वांना आवाहन करीत आहे. या पुर्वी काही महाविद्यालयामर्फत अशा प्रकारचे उपक्रम हाती घेण्यात आले असतील तर कृपया त्यावर आधारीत सर्व माहिती युक्त असे लेख पाठवावेत. ते आपल्या मासिकामधून इतर महाविद्यालयांना प्रेरणा देणारे ठरणार असल्याने अवश्य छापण्यात येतील.

आता खऱ्या अर्थाने आपले लक्ष केवळ औषधावर राहणार नसून ते औषधाबरोबरच लोकांच्या आरोग्यावर सुध्दा राहील. यामुळेच आम्ही कम्युनिटी फार्मासिस्ट म्हणून लोकांपुढे आपली ओळख करून देण्यासाठी सज्ज झाल्याचे चित्र पहावयास मिळेल यात शंका नाही.

तर मित्रांनो उठा आणि ही संकल्पना आपल्या प्रत्येक महाविद्यालयांतर्फे राबविण्यास सुरूवात करा!.

## तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर, जि. कोल्हापूर
## महाविद्यालयाचा वार्षिक दिन उत्साहात साजरा

दिनांक २१. २. २००९ रोजी वारणानगर येथील तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये वार्षिक दिनानिमित्त पार पडलेल्या कार्यक्रमास **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन** चे अध्यक्ष श्री. बी.ई.खोमणे व वरिष्ठ फार्मासिस्ट नेते श्री. बाळासाहेब तोरस्कर तसेच संस्थेचे सचिव श्री. जी.डी. पाटील यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. वरील मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या कला व क्रिडा स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. सायंकाळी विद्यार्थ्यांनी सादर केलेला मनोरंजन कार्यक्रम अत्यंत बहारदार झाला.

या प्रसंगी सर्वश्री खोमणे व तोरस्कर सरांनी फार्मसी व्यवसायास चांगले दिवस लाभावे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच शिक्षक वर्गासोबत संवाद साधला. या महाविद्यालयाच्या सर्वांगिण विकासामध्ये प्राचार्यद्वय डॉ. एस.एस.पाटील सर, जोशी सर तसेच सहयोगी प्राध्यापक वर्ग यांचे योगदान निश्चीत डोळ्यात भरणारे आहेत. हे महाविद्यालय महाराष्ट्र राज्यात आपला क्रमांक उंचावत नेण्यास यशस्वी ठरेल असा विश्वास श्री. खोमणे यांनी या प्रसंगी बोलून दाखवीला.

# सांगली येथील जेष्ठ फार्मासिस्ट श्री. पोपटराव डोरले यांचा एकसष्ठी सोहळा

दिनांक २२.२.२००९ रोजी श्री. पोपटराव डोरले यांचा एकसष्ठी सोहळा सांगली येथे त्यांचे मित्र परिवार व नातेवाईक, आप्तेष्ट यांनी एकत्र येऊन उत्साहात साजरा केला. या प्रसंगी **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनचे** अध्यक्ष श्री. बी.ई.खोमणे, श्री. बी.डी.तोरस्कर, तसेच निवृत्त सहाय्यक आयुक्त, अन्न आणि औषध प्रशासन, सर्वश्री एस. आर. पाटील, व्ही. बी. डोरले व एस. आर. बनकर व सांगली येथील समाजातील सर्व प्रतिष्ठीत व्यक्तींनी त्यांना दिर्घायुष्य लाभावे म्हणून शुभेच्छा दिल्या.

कराड फार्मसी महाविद्यालयामधून १९७१ साली बी.फार्म. ही पदवी घेऊन बाहेर पडलेले सांगली भूषण श्री. पोपटराव डोरले यांनी सुरूवातीची काही वर्षे औषधी उत्पादन कारखान्यामधून नोकरी केल्यानंतर सांगली येथे अरिहंत फार्मास्युटीकल्स या नावाने १९७७-७८ साली औषधी उत्पादन क्षेत्रात प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी कठोर मेहनत व विश्वास याद्वारे एक यशस्वी औषधी उत्पादक म्हणून नाव कमविले. आज सांगली येथे त्यांचे मालकीचे तीन औषधी उत्पादन करणारे कारखाने आहेत. त्यामधून दर्जेदार ॲलोपॅथीक, आयुर्वेदिक व जनावरांसाठी औषधांचे उत्पादन होत आहे. यासाठी अलिकडील काळात त्यांचे चिरंजीव हे बी.फार्म., एम.बी.ए. असून त्यांना या व्यवसायात मदत करीत आहेत.

श्री. पोपटराव डोरले हे सांगली येथे विविध सामाजिक व क्रिडा क्षेत्रामध्ये सक्रिय भाग घेत असतात. ते सांगली जिल्हा हौशी धावपटू संघटनेचे अध्यक्ष आहेत.

श्री. पोपटराव डोरले यांना **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन** तर्फे त्यांचे उर्वरीत आयुष्य आरोग्याचे व भरभराटीचे जावो ही शुभेच्छा!

# महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनचे पदाधिकारी व नेते मंडळींचा संपर्क दौरा

दिनांक ८.२.२००९ रोजी ठाणे येथे **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनचे** पहिले राज्यव्यापी अधिवेशन अत्यंत यशस्वीरित्या पार पडल्यानंतर संघटनेचे कार्य झपाट्याने विस्तारण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष श्री. बी.ई.खोमणे व इतर वरीष्ठ नेत्यांनी पश्चिम व उत्तर महाराष्ट्राचा झंजावती दौरा केला.

दिनांक १३, १४ व १५ फेब्रुवारी रोजी संघटनेचे अध्यक्ष श्री. बी.ई.खोमणे, श्री. सचिन इटकर, व एम. आय.टी फार्मसी महाविद्यालय पुणे चे प्राध्यापक श्री. अनंत कदम यांनी आळे फाटा, ओतूर, संगमनेर व प्रवरा नगर येथे जाऊन तेथील फार्मसी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व विद्यार्थ्यांना फार्मसी व्यवसायातील विविध क्षेत्रामधील नोकरीच्या संधी बाबत मार्गदर्शन केले. तसेच असोशिएशनचे सभासद बनून **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनचे** कार्य वाढविण्यासाठी आवाहन केले. यासाठी तेथील प्राचार्य सर्व श्री. गायकवाड सर, गणेश दामा सर व डॉ. चौधरी सर तसेच सर्व प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी यांचे उत्तम सहकार्य लाभले.

**महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनचे** अध्यक्ष श्री. बी.ई.खोमणे व वरिष्ठ नेते श्री. बाळासाहेब तोरस्कर यांनी दिनांक २१ व २२ फेब्रुवारी २००९ रोजी वारणानगर, कासेगाव, सांगली व कोल्हापूर येथे जाऊन विद्यार्थी, कम्युनिटी व हॉस्पिटल फार्मासिस्ट व प्राध्यापक वर्गांच्या सभा घेऊन **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनचे** कार्य अधिक जोमाने वाढावे म्हणून मार्गदर्शन केले. यावेळी सर्व फार्मासिस्ट सहकाऱ्यांनी महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन ने सुरू केलेल्या मोहिमेमुळे फार्मसी व्यवसायास चांगले दिवस बघावयास मिळतील अशी आशा व्यक्त केली.

दिनांक २७ फेब्रुवारी २००९ रोजी चिंचोली ता. सिन्नर, जि.नाशिक येथील प्रवरा रूरल ट्रस्ट संचालित महिला फार्मसी महाविद्यालयास **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनचे** अध्यक्ष श्री. बी.ई.खोमणे व डॉ.सतिश य.गाभे, प्राचार्य एस.एन.डी.टी. फार्मसी महाविद्यालय, जुहू, मुंबई यांनी भेट देऊन तेथील विद्यार्थीनी व प्राध्यापक वर्गास **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनचेच्या** कार्याबद्दल माहिती दिली.

दि. २८ फेब्रुवारी, २००९ रोजी **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनचे** अध्यक्ष श्री. बी.ई.खोमणे व जळगाव येथील अजिंठा फार्मास्युटीकल्स चे व्यवस्थापक श्री. जी.पी. सुपे यांनी चोपडा येथील फार्मसी महाविद्यालयास भेट देऊन विद्यार्थी व प्राध्यापक वर्गाशी हितगुज केले व फार्मसी व्यवसायाच्या वृदधीसाठी सर्वांनी **महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनच्या** झेंड्याखाली एकत्र येऊन काम करण्याचे आवाहन केले.

# Appeal to Advertisers/Subscribers of "Aamhi Pharmacist!"

We are happy to announce the publication of our organ, "Aamhi Pharmacist!" a bilingual monthly magazine, has been started from March, 2009.

The object is to disseminate the professional happenings and update pharmacist about the activities of "Maharashtra Pharmacist Association".

"Aamhi Pharmacist!" is going to be circulated to its members, student pharmacist, hospitals, pharmacies, food and drug administration offices, pharmacy educational institutes and all stakeholders of the pharmacy profession across Maharashtra State.

Hence this is an exclusive opportunity to reach out to thousands of health professionals like pharmacists working in pharmacies, hospitals, marketing, educational institutes, drug control offices, CROS and R & D companies, regulatory departments.

So avail this opportunity and advertise your products/services/utilities/Job vacancies/greetings/any communication need, etc. Fill the enclosed form and return along with advertisement material and payment as indicated therein to Maharashtra Pharmacist Association.

**Thanks and Regards**

**B.E.Khomne**
**President**
**Maharashtra Pharmacist Association**

**To,**
**The President**
**Maharashtra Pharmacist Association**
**3, Gr. Fl, Kiran Society, Dada Patil marg,**
**Naupada, Thane 400 602**

We would like to advertise in you esteemed magazine, "Aamhi Pharmacist!" in format as indicated below;

| | | |
|---|---|---|
| 1. | Full page | Rs. 10,000/- per insert |
| 2. | Half page | Rs. 5,000/- per insert |
| 3. | Quarterly page | Rs. 2,500/- per insert |
| 4. | Bottom space of the page (Approximately qtr. page) | Rs. 3,000/- per insert |
| 5. | Classifieds (Only for jobs) | Rs. 500/- for 30 words<br>Rs. 100/- for next 10 words. |

We also desire to subscribe to "Aamhi Pharmacist!" for One/Two/Three years

**Issue subscription rates:**

| | | **For Institutes** | **For members of MPA** |
|---|---|---|---|
| One year | (12 Issues) | Rs. 1000/- | Rs. 200/- |
| Two year | (24 Issues) | Rs. 2000/- | Rs. 400/- |
| Three year | (36 Issues) | Rs. 3000/- | Rs. 600/- |

Name: Designation:

Company Name:

Address:

Tel. No: Mobile No: Email:

Cheque/D.D No: ____________________dated______________________________

Drawn on (Bank Name) __________________________________________________

In favour of "**Maharashtra Pharmacist Association**"

Date: Signature:

Printed, published and edited by Shri. B.E.Khomne Published from 103, Vakratunda, 1st Fl., A-wing, Bhakti mandir Rd., Panchpakhadi, Thane 400 602
Email: bekhomne@yahoo.co.in Tel: 25341613 Mob: 9322235306 and printed from M/s Maharashtra Printers and Advrtisers, Classic Plaza, Gokhale Road, Naupada, Thane 400 602 Te: 25408299

View expressed in the articles of "Aamhi Pharmacist!" are those of authors and not of editor.

Important: while reasonable care is taken prior to publication of an advertisements. However "Aamhi Pharmacist!" will not be responsible for contents of advertisements, nor for any loss or damages incurred as a result of transactions with the persons advertising in this issue. It is therefore necessary to make inquiries before sending any money or entering into any agreements on an advertisement in any manner whatsoever.

# MAHARASHTRA PHARMACIST ASSOCIATION

3, Kiran Society, Gr. Floor, Dada Patil Marg, Naupada,Thane – 400602. Ph. No. 022- 22946836/ 25341613
E-mail- admin@mahapharma.com Website- www.mahapharma.com

## Membership Form

**Note:** Please sign Within the Box, in BLACK ink only

Affix Photograph

NAME :

DATE OF BIRTH : GENDER : MALE ☐ FEMALE ☐ BLOOD GROUP :

FIRST PHARMACY QUALIFICATION : D. PHARM. ☐ B. PHARM. ☐

YEAR OF PASSING :
(NOT APPLICABLE FOR STUDENTS)

FOR PHARMACY STUDENTS CURRENT CLASS : I ☐ II ☐ III ☐ IV ☐

NAME OF COLLEGE AND ADDRESS :

HIGHER/ADDL. QUALIFICATION :

PRESENT JOB/ ACTIVITY :

RESIDENTIAL ADDRESS :

MOBILE NO : TEL. NO. :
EMAIL :

I ENCLOSE A CHEQUE / D.D. NO. DRAWN ON

IN FAVOUR OF “MAHARASHTRA PHARMACIST ASSOCIATION”

NOTE: MEMBERSHIP FEE IS RS. 1,000/- FOR PHARMACIST AND RS. 500/- FOR STUDENT.

DATE : SIGNATURE

With Best Compliment from

Mr. Haresh Mehta
B.Pharm.
Director

Mr. Harshit Mehta
B.Pharm.
Tech. Director

## MEDICO REMEDIES PVT. LTD.

**Manufacturers of Pharmaceutical Formulations :**
**Tablets – Capsules – Dry Syrup**

**Off :** 50, Juhu Supreme Shopping Centre, Gulmohar X Rd. No. 9,
Juhu, Andheri (W), Mumbai – 400 049
Tel: 2670 1055/66 Fax : 26281059
**Email :** harry_mehta642@hotmail.com / haresh_mehta@mtnl.net.in
infor@medicoremedies.com
**Website :** www.medicoremedies.com

**Factory :** 8 & 9, Dewan & Sons Udyog Nagar, Palghar,
Dist. Thane, Maharashtra
Tel: 952525 – 327113/256381 Fax : 952525 - 255287

With Best Compliment from

## *ajanta pharma limited*

**Ajanta House,**
Charkop, Kandivli (W), Mumbai – 400 067 India
Tel : + 91-22-2868 3625
Fax : + 91-22-2868 2848
E-mail : ajanta@vsnl.com
Website : www.ajantapharma.com

Factory : 31-O, MIDC Industrial Area, Chikalthana, Aurangabad – 431210